**योजनेचे नांव :- अल्पसंख्यांक बहूल ग्रामीण क्षेत्रात मुलभुत/पायाभूत सुविधा पुरविणे.**

१ योजना कोणाची :- महाराष्ट्र शासनाची योजना

२ योजनेची संक्षिप्त माहिती :- अल्पसंख्यांक विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.ग्राक्षेवि/2015/प्र.क्र.77/का-9 दि.22.09.2015 नुसार योजनेच्या मार्गदर्शक सुचना व घेणेत येणारी कामे.

**योजनेंतर्गत घ्यावयाची कामे:-**

1.कब्रस्तान/स्मशान/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंत (4फुट उंची व 1 फुट रुंदी) पाणी सुविधा विद्युत पुरवठा, व अंतर्गत 3 फुट रुंदीचा रस्ता.

2.सार्वजनिक सभागृह /शादीखाना हॉल बांधणे.

3.पिण्याच्या पाण्याची सुविधा/विद्युत पुरवठा/इदगाह/सांडपाण्याची व्यवस्था/अंतर्गत रस्ते/पथदिवे/सार्वजनिक स्वच्छतागृहे.

5) योजनेचे निकष व अटी शर्ती

१. किमान 100 अल्पसंख्यांकांची लोकसंख्या असलेली ग्रामपंचायत पात्र ठरते .
२. जि.प. स्तरावरुन उतरत्या क्रमाने ग्रामपंचायतीची निवड मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली केली जाते.
३. अल्पसंख्यांक समितीचे अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी आहेत.
४. ग्रामसभेला कामाची निवड करण्याचे अधिकार आहेत.व त्यानुसार ठराव आवश्यक असतो.
५. ग्राम पंचायत मालकीच्या जागेचा उतारा आवश्यक आहे.
६. निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नांेद असलेला ग्रा.प.नमुना नं.26 चा उतारा
७. समजुतीचा नकाशा
८. ग्रामसभेने निवडलेले काम इतर योजनेमधून घेतले नसलेबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
९. मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षेखाली नियुक्त समितीने केले शिफारशीने प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला जातो.

६) योजनेचे फायदे

- ज्या ग्रामीण भागात अल्पसंख्यांकाची लोकसंख्या लक्षणीय आहे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी मदत होते. सदरची योजना सन 2013-14 पासून अमलात आलेली आहे.
- अल्पसंख्यांक बहूल भागात सोई सुविधा देणे शक्य होते. तसेच सदर भागातील नागरीकाना आवश्यक सोई मिळतात.
- गावामध्ये तसेच अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रामध्ये समाजिकदृष्टया पोषक वातावरण तयार होते. अल्पसंख्यांक वस्तीमध्ये आवश्यक व निकडीच्या असणाऱ्या गरजा पुर्ण होणार आहेत.